# चुलीपल्याड...

अंक १३ वा – डिसेंबर २०१९

**सप्रेम नमस्कार,**

सालाबादप्रमाणे नवं वर्ष सुरू झालं. सालाबादप्रमाणे शुभेच्छांची देवाणघेवाण झाली. त्याच वेळी व्हॉटस अॅपवर हस्ताक्षरातला एक मेसेज आला. गंभीरपणे वाचायला सुरवात केली. ‘तिघे जण तुमचा नंबर मागत होते. मी नाही दिला. पण तुमच्या घरचा पत्ता दिलाय. ते येत्या नवीन वर्षात तुमच्या घरी येतील. त्यांची नावं आहेत सुख, शांती, समृद्धी. नवीन वर्षाच्या शुभेच्छा!‘ सुरवातीचा गंभीर भाव आपोआप नाहीसा झाला आणि हसू आलं. मजा वाटली.

शुभेच्छांमागे सद हेतू असतोच. पण तो बाजूला ठेवून विचार करता असताना अनेक प्रश्न पडले. माझ्या घरी सुख, शांती, समृद्धी येणार की नाही हे फक्त माझ्यावर अवलंबून आहे का? सुख, शांती नक्की कशात असते? म्हणजे मी भरपूर काम केलं की मला भरपूर पैसा मिळेल मग मी सुखी होईन. असं सोपं गणित आहे का? भरपूर काम करायची तयारी असणाऱ्या, प्रत्येक व्यक्तीला काम नोकरी मिळते का? काम, नोकरी मिळणं कशा कशावर अवलंबून असतं? समाज अशांत असेल, तर मनाची शांतता लाभू शकते का? शेजारच्या घरात आग लागली असेल, तर आपल्या घरात शांतपणे राहता येतं का? तिकडे समाजात काहीही होऊ दे, सरकार कसंही वागूदे, माझा काय त्याच्याशी संबंध? असं म्हणता येईल का? सरकारच्या प्रत्येक निर्णयाचे, समाजातल्या प्रत्येक घडामोडीचे परिणाम नागरिक म्हणून आपल्यावर होत असतात. हैद्राबादमधल्या सामूहिक बलात्काराच्या घटनेनंतर मुळशी तालुक्यातल्या छोट्याशा गावातल्या वृषालीच्या घरी तिच्या लग्नाची बोलणी लगेच सुरू होतात. तिला या दोहोतला संबंध समजतो. अशा घटनेमुळे किती जणींचं शिक्षण बंद पडलं असेल, शाळा सुटल्या असतील, लग्न लवकर उरकली असतील! त्यामुळे किती जणींना त्यांच्या इच्छा आकांक्षा–स्वप्नांना सोडून द्यावं लागलं असेल, स्वत:तल्या क्षमता वापरायची, फुलवण्याची संधीच मिळाली नसेल? उच्च शिक्षणाच्या वाढवलेल्या अफाट फियांमुळे शिक्षणामधून कोण कोण वगळलं जाईल? नागरिकत्व कायद्यामुळे कोणाकोणा भारतीयाचं ‘भारतीयत्वच’ नाहीसं होईल?..... प्रश्नच प्रश्न आहेत. माझ्या देशातल्या स्त्रियांना, अल्पसंख्याकांना, दलितांना असुरक्षित वाटत असेल तर मला नाही वाटू शकत सुरक्षित.

माझ्या देशात आणि जगात घडणाऱ्या अशा असंख्य घटना ठरवणार आहेत माझ्या आयुष्यात सुख, समृद्धी आणि शांती येणार आहे की नाही. आणि म्हणूनच आपण सजग असायला हवं, विवेकी असायला हवं, आपल्या हक्कांसाठी कृतिशील असायला हवं. हे केवळ आपल्यासाठीच नव्हे तर येणाऱ्या पिढ्यांच्या हातात आपण कोणतं जग ठेवणार आहोत यासाठीही महत्त्वाचं आहे.

आपली,

**वंदना**

## अंतरंग


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | साक्षरतेचा वसा आणि बदलणारी ‘ती’ | २ | ७. | आम्ही ‘बि’घडलो | १२ |
| २. | त्यांनाही माणूस म्हणून जगू द्या | ५ | ८. | वाचक लिहितात... | १४ |
| ३. | धरूया माणुसकीचा हात | ६ | ९. | पुस्तकाच्या खजिन्याने काय काय दिले | १५ |
| ४. | मी तिच्या पाठीशी राहीन | ७ | १०. | थोडसं मनातलं... | १७ |
| ५. | सहभावी समाजासाठी ‘सलोखा’ | ८ | ११. | नवरात्रीतले नऊ रंग | १९ |
| ६. | पुरुषसत्ताक व्यवस्था संपवूया | ११ | १२. | जरा शांतपणे विचार करूया? | २० |





# साक्षरतेचा वसा आणि बदलणारी ‘ती’

विद्या हे धन आहे रे। श्रेष्ठ साऱ्या धनाहून
तिचा साठा जयापाशी। ज्ञानी ती मानती जन

या सावित्रीमाईंच्या ओळी किती अर्थपूर्ण आहेत. शिक्षणाची महती जाणून त्यांनी स्त्रिया आणि शूद्र यांना शिक्षणाचा हक्क मिळवून देण्यासाठी अपरिमित संघर्ष केला. शतके लोटली या संघर्षाला मात्र स्त्रियांची शैक्षणिक स्थिती फारशी सुधारली नाही. विद्या या धनाचा साठा करण्याची परवानगी बहुसंख्य स्त्रियांना मिळालीच नाही. इच्छा, क्षमता, पात्रता असूनही त्यांना विद्याधनाचा साठा करताच आला नाही. मग या निरक्षर स्त्रियांना ज्ञानी मानायचा प्रश्नच उरला नाही. त्या स्वतंत्र भारततही निरक्षर, अज्ञानीच राहिल्या. शिक्षण आणि विकासाचे अतूट नाते असूनही देशातील अनेक स्त्रियांना शिक्षणाचा हक्क मिळालाच नाही. मग त्यांचा विकास तरी कसा होणार? भारतामध्ये आजही प्रौढ साक्षरतेची अवस्था बिकट आहे. निरक्षरतेमध्ये प्रादेशिक व लिंग आधारित निरक्षरता मोठी आहे. प्रौढ स्त्रियांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण बरेच मोठे आहे.

### ‘अडाणी’ ओळख पुसण्याचा निर्धार

साक्षर झालेला आणि सामाजिक जाणीव असलेला समाजच लोकशाही समाजासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतो. असा समाजच राष्ट्राच्या विकासात वाटा उचलतो. म्हणूनच भारतामध्ये राष्ट्रीय नियोजनात प्रौढ साक्षरतेला सुद्धा महत्त्व देण्यात आले आहे. याचाच परिणाम म्हणून प्रौढ साक्षरता वर्गांना प्रोत्साहन देण्यात आले आहे. जनतेमध्ये या कार्यक्रमाबद्दल जागृती, शिकणाऱ्यांचा सहभाग आणि स्वयंसेवी संस्थांचा सहभाग या तिन्ही वैशिष्ट्यांचा समावेश करून संपूर्ण साक्षरता अभियानाची अंमलबजावणी केली जाते. मागील काही वर्षांपासून आंबेगाव तालुका, जिल्हा पुणे याठिकाणी याच पध्दतीने साक्षरता वर्ग नियमित सुरू आहेत. हा सगळा आदिवासी भाग आहे. या भागात जेथे मुलांना शिक्षण घेण्यातच अनेक अडचणी आहेत तेथे प्रौढ साक्षरतेची स्थिती तर गंभीरच असणार. या



भागात निरक्षर स्त्रियांचे प्रमाण जास्त होते. चूल-मूल सांभाळून शेतीच्या कामाला वर्षभर जुंपून असणाऱ्या आणि रोजच्या जगण्याचे प्रश्न सोडवण्यात अडकून गेलेल्या स्त्रियांना साक्षर करणे खरे तर मोठे आव्हान होते. पण हे आव्हान आदिम संस्कृती अभ्यास संशोधन व मानव विकास केंद्र आणि रोटरी क्लब पुणे यांनी संयुक्तपणे पेलले. या ग्रामीण स्त्रियांना साक्षर करून त्यांची 'अडाणी' ओळख पुसण्याचा निर्धार पक्का झाला. कृती सुरू झाल्या, सुरवातीला दोन वर्ग सुरू करण्यात आले. त्यानंतर मात्र दहा, सतरा अशा क्रमाने दरवर्षी या वर्गांमध्ये वाढच होत गेली. या स्त्रियांना वाचन, लेखन, अंकज्ञान या सोबत कायदा साक्षरतेची, आरोग्य साक्षरतेची व आर्थिक नियोजनाची ओळख करून देण्यात येऊ लागली. त्यांची साक्षरताप्राप्ती व्यापक बनवली. आजही हे वर्ग याच धर्तीवर सुरू आहेत.

## स्त्रियांनी वर्गात यावे म्हणून

सुरवातीला वर्ग सुरू करण्यात अनेक अडचणी आल्या. स्त्रियांमधील न्यूनगंड काढून या वयात शिक्षणासाठी तयार करणे, त्यांना वर्गांमध्ये जमवणे ही मोठी समस्या होती. म्हणून मग कृतिकार्यक्रम आखण्यात आला. योजनाबद्ध समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रम, आरोग्य शिबिरे, विविध स्पर्धा, सातत्याने बैठका, स्त्रियांसोबत नियमित संवाद व चर्चा या माध्यमातून या समस्येवर मात करण्यात यश आले. स्त्रियांमध्ये आत्मविश्वास वाढला, शिक्षणाचे महत्त्व त्यांना पटू लागले. चुलीच्या धुरात काळवंडून गेलेल्या त्यांच्या जगाला या कार्यक्रमांनी रंगीबेरंगी आनंदाचे क्षण दिले. रोजच्या अपरिमित श्रमांच्या रहाटगाड्याहून वेगळे असे हे क्षण त्यांच्यासाठी निखळ उसंतीचे ठरले. त्यांना अभिव्यक्त होण्यासाठी व्यासपीठ मिळाले. स्वतःची वेगळी ओळख असणारे ठिकाण या वर्गांमुळे त्यांच्या वाट्याला आले. म्हणूनच तर साक्षरता वर्गांची त्यांना गोडी लागली. संगीत खुर्ची, पाककला स्पर्धा, जुन्या आदिवासी गीतांची स्पर्धा, रांगोळी स्पर्धा यांना त्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. त्यांच्या अंगातील कलागुणांना वाव मिळाला.

## आरोग्य शिबिरांचा दुहेरी फायदा

आरोग्य शिबिरे स्त्रियांना संघटित करण्यात जितकी महत्त्वाची ठरली त्याहून जास्त ती त्यांच्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरली. साक्षरता वर्गांच्या माध्यमातून अनेक प्रकारची आरोग्य शिबिरे घेण्यात आली. त्यातून या स्त्रियांच्या आरोग्याचे प्रश्न सोडवण्यावर व त्यांना आरोग्य साक्षरतेचे मार्गदर्शन करण्यावर भर देण्यात आला. डोळे तपासणी शिबीर त्यांच्यासाठी लाख मोलाचे ठरले. साक्षरतेचे वर्ग रात्री सुरू असतात अनेक स्त्रियांना डोळ्यांच्या तक्रारी होत्या. डोळे तपासणी शिबिराच्या माध्यमातून त्यांना चष्मे वाटप करण्यात आले. या समस्येपासून त्यांना मुक्ती मिळवून दिली. रक्त तपासणी करून हिमोग्लोबिन तपासण्यात आले. ॲनिमिया असणाऱ्या स्त्रियांना पूरक औषधे नियमित या आरोग्य साक्षरतेचा सकारात्मक परिणाम स्त्रियांच्या मानसिकतेवर आणि वर्गातील त्यांच्या उपस्थितीवर दिसून आला.

## 'आमचा अभ्यासक्रम आम्हीच बनवला'

दुसरे आव्हान अभ्यासक्रमाचे होते. सुरवातीला राज्य साधन केंद्र, पुणे यांचा अभ्यासक्रम उपयोगात आणला. परंतु आदिवासी समाजाची वेगळी जीवनशैली, वेगळी भाषाशैली लक्षात घेता, अभ्यासक्रम शक्य तितका लवचिक, जीवनस्पर्शी व उपयुक्त असण्याची निकड जाणवू लागली. या प्रौढ आदिवासी स्त्रियांची मानसिक, भावनिक, स्थानिक स्थिती समोर ठेवून






तयार केलेला अभ्यासक्रमच साक्षरतेची अपेक्षित उद्दिष्टे साध्य करून देऊ शकेल असे लक्षात आले. याच गरजेतून आपला अभ्यासक्रम आपणच बनवायचा असे ठरले. त्यानुसार साक्षरतावर्गांच्या स्वयंसेविका ताईंचे एकदिवसीय प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले. या ताईंनी त्यांचा अभ्यासक्रम स्वतःच बनविला. नागनाथ कोतापल्ले सर या प्रशिक्षणासाठी उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा नवा अभ्यासक्रम तयार झाला. या स्त्रियांची परीक्षा घेण्यात आली आहे. उत्तीर्ण २०० स्त्रियांना गुणपत्रक प्रदान करण्याचा कार्यक्रम २४ नोव्हेंबरला पार पडला. सर्व स्त्रियांना एका रंगाच्या साड्या गणवेश म्हणून देण्यात आल्या आहेत. साक्षरता वर्गासबंधी काही वर्षांपूर्वी दिल्लीत माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांच्या उपस्थितीत एक कार्यक्रम झाला होता. या कार्यक्रमाला सावरली येथील सखुबाई केंगले या उपस्थित राहिल्या होत्या. एका सामान्य अशिक्षित आदिवासी स्त्रीला या कार्यक्रमात उपस्थित रहाण्याची संधी फक्त ती साक्षर झाली म्हणून मिळाली होती.

### हक्कांसाठीची जागरूकता

साक्षरतेचे महत्त्व फक्त एका व्यक्तिपुरते सीमित कधीच नसते. संपूर्ण समाज या उजेडात प्रकाशित होत असतो हे या वर्गांतून साक्षर झालेल्या स्त्रियांनी खरे करून दाखवले आहे. हे त्यांच्या अनुभकथनातून सिद्ध होते. साक्षरता वर्गांच्या माध्यमातून कायदा साक्षर करण्याचा चांगला परिणाम झाला. या वर्गांतील अनेक स्त्रियांनी आपल्या रोजगारासाठी ग्रामसभेत रोजगार हमी योजनेचा मुद्दा मांडला.

बँकेत गेल्यावर टेबलापलीकडील व्यक्तीने सवयीने अंगठा टेकवण्यासाठी पुढे केलेल्या कागदावर मला सही येते असे सांगत एकीने आत्मविश्वासाने सही केली आणि त्याला अचंबीत केले. एका आई-मुलीची जोडी रोज रात्री बऱ्याच उशिरापर्यंत टीव्ही पहात असे. मात्र आई साक्षरता वर्गासाठी येऊ लागताच मुलगी ही येथे येऊ लागली. दोघीही मिळून अभ्यास करू लागल्या. साक्षरता वर्गांमुळे आम्ही एकत्र आलो आणि टीव्हीपासून सुटका झाली. स्वतंत्र विचार करण्याची सवय लागली असे मत काहीजणींनी बोलून दाखवले. कुशिरे खु. येथील एक बाई स्वतःच गाडीच्या पाटीचे एक-एक अक्षर वाचून बरोबर आपल्या ठिकाणाला आल्या. हे सांगताना त्यांच्या चेहऱ्यावर आत्मविश्वासाची चमक होती. पिंपरी येथील एकीने सांगितलेला प्रसंग असाच हृदयस्पर्शी आहे. ही स्त्री अडाणी होती. मुलाचे लग्न झाले तेव्हा तिला त्याची लग्नपत्रिका वाचता आली नाही. याचे तिला दुःख होते. नातवाचे लग्न ठरले. साक्षरता वर्गातून झालेल्या अक्षर ओळखीमुळे आपल्या नातवाची संपूर्ण लग्न पत्रिका आपण वाचून काढली असे तिने सांगितले. हे सांगताना तिला झालेला आनंद अवर्णनीय होता. आयुष्यात इतक्या छोट्या गोष्टींमधून आपला आनंद आणि समाधान या स्त्रिया शोधत असतात पण निरक्षरता तोही हिरावून घेते. त्यांच्या अनेक पिढ्या या आनंदाला पारख्या झाल्या होत्या. त्यांनाही हे समाधान मिळण्याची शक्यता नव्हती. मात्र साक्षरता वर्गांनी ही किमया केली. त्यांना समाधान देणारा आनंद या शिक्षणातून मिळवून तर दिलाच. पण त्यांना आपल्या हक्कांसाठी प्रश्न विचारण्यासाठीही तयार केले आहे. येथे स्त्री शिक्षितही होते आहे आणि चिकित्सकही. स्त्रीमुक्ती आणि राष्ट्रोन्नतीचा मार्ग सुकर करण्यासाठी साक्षरतेला घरोघरी नेण्याचे काम आदिम आणि रोटरी क्लब पुणे यांनी जोमाने सुरू केले आहे.

**रोहिणी नवले**
आदिम संस्था, आंबेगाव

# त्यांनाही माणूस म्हणून जगू द्या

मी गेली २ वर्ष दिशा पतसंस्थेत काम करत आहे. दर महिन्याला आलोचना संस्था आमच्या स्टाफसाठी प्रशिक्षण घेते. त्यामध्ये वेगवेगळे विषय घेतले जातात. अंधश्रद्धा नाहीशा व्हाव्यात, समाजातले भेद नाहीसे व्हावेत, संवेदनशीलता वाढावी, 'का' हा प्रश्न विचारावा यासाठी ताईंचा प्रयत्न असतो. वेळोवेळी वेगवेगळ्या विषयाच्या माध्यमातून समाजाला जवळ आणण्याचा प्रयत्न करतात.

वेगवेगळी लैंगिकता असणाऱ्या लोकांबद्दल ताईंनी माहिती सांगितली. लेख वाचले. हिजडा व्यक्तींविषयी बोललो. गौरी सावंत यांच्यावरची फिल्म आम्ही पाहिली. ते सारंच मन हेलावून टाकणारं होतं. तोपर्यंत मी कायमच अशा लोकांपासून दूर राहण्याचा प्रयत्न करत होते. भीतीही वाटायची. मी माझ्या मुलांनाही त्यांच्याजवळ जाऊ देत नव्हते. त्यांच्याशी संवाद तर लांबच पण त्यांना पाहून मी माझा रस्ताही बदलायचे. पण आलोचनाच्या प्रत्येक ट्रेनिंगने आम्हाला विचार करायला भाग पाडलं. माणूस म्हणून त्यांचा विचार करायला लागलो. भीती कमी होऊन जवळीकता निर्माण झाली. मी आता थांबून त्यांच्याशी गप्पाही मारते. आमच्या कॉलनीमध्ये एक हिजडा आपल्या आईसोबत राहते व घरकाम करते. मी त्यांच्याशी बोलते. वाटेत भेट झाली तर त्यांच्या टू व्हिलरवरून ऑफिसलाही येते. मी त्यांना माझ्या घरी काम करण्याबद्दलही विचारेन. पण आमच्या बिल्डिंगमधले लोक त्याला नकार देतील हे नक्की. कारण त्यांचे विचार तेवढे विकसित झालेले नाहीत. त्यांनाही कुठून तरी आलोचनाचं ट्रेनिंग देण्याची गरज आहे. याबद्दल मी माझ्या शेजारी असणाऱ्या काकूंजवळ बोलले. पण त्यांनी साफ नकार दिला. त्यांना मी समजवून सांगितलं पण त्यांनी बिल्डिंगमधील लोकांची मानसिकता सांगितली. पण जेव्हा केव्हा मला माझ्या घरकामासाठी बाई लागेल तेव्हा मी प्रथम त्यांना विचारेन व बिल्डिंगमधील किंवा घरातून याला विरोध झाला तर त्यांना पटवून सांगेन की तीही माणूसच आहे. त्यांनाही माणूस म्हणून जगू द्या.

**अरुणा पवार**
दिशा, तळेगाव

# वाचाल तर वाचाल

वाचाल तर वाचाल असं म्हणतात
आयुष्याचा गोष्टींवर पुस्तकं बोलतात
आवाजाच्या साथीला ही साथ देतात

एकांतालाही प्रकाशाची जोड देतात
शंकेलाही उत्तराचे तोंड देतात
आयुष्याच्या रोडला 'मोड' देतात...

मित्राच्या स्वरूपात समजवतात
वडिलांच्या रूपात बोलतात
आईच्या रूपात लाडवतात
आणि म्हणून पुस्तकं ओढ लावतात...

गोष्टीलाही रम्यक करतात
कवितेलाही भारावून टाकतात
कथेच्याही प्रेमात पडतात
आणि... दुराचारही हसत विसरतात...

वाक्यांची ढिल आहे
शब्दांची फोड आहे
म्हणूनच वाचायला गोड आहे
कारण वाचाल तर वाचाल ही म्हण आहे...

**मानसी**
पांडव नगर, पुणे

# धरूया माणुसकीचा हात

आज २१ व्या शतकामध्ये जातीवाद या विषयावर बोलण्याची वेळ का येते? कारण आजही खूप जास्त प्रमाणात जातीच्या व धर्माच्या नावावर भेद व विवाद दिसून येत आहे.

माझ्या बालपणापासून आत्तापर्यंत मी जातीभेद बघत आली आहे. लहानपणी एक गोष्ट माझ्या पालकांनी मला शिकविली होती की, 'कोणत्याही जातीच्या व्यक्तिशी आपलेपणाने वागावे. कारण सर्वजण माणूस म्हणून सारखीच असतात. त्यांचा जर हात कापला आणि आपला हात कापला तर दोघांचे रक्त वेगवेगळ्या रंगाचे नसते.'

आज आपल्या देशात कित्येक समस्या आहेत. शेतकऱ्यांच्या समस्या, आदिवासींच्या समस्या. त्यांच्या हक्कांसाठी आपण काही लढा देऊ शकतो का हा विचार सोडून कुठे गुंतलाय आपला समाज? आपण आज विज्ञानात मोठी प्रगती करतोय पण काही ठिकाणी लहान लहान मुलांना शिक्षणासाठी दारोदारी भटकावे लागतेय. आपली प्रगती आणि विकास याकडे कुठेतरी दुर्लक्ष होत चालले आहे आणि जातीवाद करून आपण एक पाऊल मागे जात आहोत. जन्माला आलेले मूल कुठल्या जातीत जन्माला आले आहे यावर त्याचे/तिचे शिक्षण, काम आणि मरण ठरवणारे हे कोण? ज्यांना अजून 'जात' म्हणजे काय हे देखील माहीत नाही अशा लहानग्यांचा देखील केवळ जातीसाठी जीव घेतला जातो.

जातीवाद करून निष्पाप लहान मुलांना 'टार्गेट' करणाऱ्यांनी स्वतःवर गर्व करण्यापेक्षा स्वतःच्या थोबाडीत मारायला हवी. कुठल्या जातीने, धर्माने सांगितले आहे की आपली जात अबाधित ठेवण्यासाठी दुसऱ्या जातीच्या नागरिकांचे प्राण घ्या म्हणून?

आपल्या देशात कित्येक थोर समाजसुधारक होऊन गेले त्यांनी जातीभेद मिटवण्यासाठी आपले आयुष्य वेचले. शिवाजी महाराजांसारखे लढवय्ये राजे इथे होऊन गेले. त्यांनी जातीवाद केला नाही किंवा हिंदू-मुस्लिम असा भेदभाव कधीच केला नाही. शिवाजी महाराजांचे ३१ अंगरक्षक होते. त्यातले १० मुसलमान होते. शिवाजी महाराजांनी एकही मस्जीद पाडली नाही किंवा कुराण जाळले नाही. रायगड किल्ल्यावर राजधानी बांधल्यानंतर तेथे जगदिश्वराचे मंदिर बांधण्यात आले. त्यावेळी महाराजांनी मंत्र्याला विचारले की, 'जगदिश्वराचे मंदिर बांधले पण माझ्या मुस्लिम सैनिकांसाठी मस्जिद कुठे आहे?' त्यावेळी मंत्री म्हणाले, ''महाराज जागा दाखवा''. त्यावेळी महाराजांनी आपल्या राजवाड्यासमोरील जागा दाखवली. तेथे मस्जिद बांधण्यात आली. हा इतिहास का सांगितला जात नाही? हा इतिहास समाजापुढे आला तर हिंदू-मुस्लिम यांच्यामधील सामाजिक दरी निश्चित नाहीशी होईल.

आपण माणूस आहोत. आपले सर्वाचे रक्त लाल आहे. माणुसकी हीच आपली जात आणि धर्म आहे. हा विचार प्रत्येकाने करावा. भारतात इंग्रजांनी आपल्यावर दिडशे वर्षे राज्य केले. हे कसे बरे शक्य झाले? कारण त्यांनी आपल्या लोकांचा अभ्यास केला आणि त्यांनी एक निष्कर्ष काढला तो म्हणजे भारतीय लोकांना जातीभेद, धर्म-भेद, प्रांत-भेद या गोष्टीत पेटवायचे, मग हे ३० काय ३०० करोड जरी झाले तरी कधीही आपल्या सोबत लढणार नाहीत. कारण हे एकमेकांनाच कापत बसतील. पण एक होणार नाहीत. दुर्दैवाने हे आजही लागू होते. मी मराठा, मी धनगर, मी चांभार, मी कुंभार, मी महार, मी ब्राह्मण, मी माळी, मी अमुक आणि मी तमुक.... यातच आम्ही आमचे श्रेष्ठत्व

मानतो. मित्रांनो ६७४२ जाती आहेत.

आज आम्ही एवढे मोठे झालो आहोत की थोर युग पुरुषांच्याही आम्ही वाटण्या केल्या आहेत. टिळक, सावरकर ब्राह्मणांचे झाले, आंबेडकर दलितांचे, शिवाजी महाराज मराठ्यांचे, मल्हारराव होळकर धनगरांचे...

म्हणूनच म्हणावेसे वाटते,

'जाता जाता नाही ती जात,
इंग्रजांनी केली वाताहात
आपण बनवले गेलो हातोहात,
आता तरी उठा आणि धरा माणुसकीचा हात
पटत असेल तर आचरणात आणा,
नाहीतर आजही कोणाचे तरी गुलाम बनून जगा.'

**कांचन येसनकर**

साधना व्हिलेज, चिखलगांव, मुळशी

# मी तिच्या पाठीशी राहीन

मी एक गृहिणी आहे व शेती हा आमचा व्यवसाय आहे. चूल, मूल व शेती हा आमचा नित्यक्रम. एक दिवस प्रभाताई आमच्या गावात आल्या. त्यांनी 'शिवणकाम' क्लास घेतला. त्यांच्या 'वर्क फॉर इक्वॅलिटी' या सामाजिक संस्थेची माहिती सांगितली. मी 'प्रेरणा ताई' म्हणून त्यांच्या सोबत काम करायला लागले. हे काम करताना खूप काही शिकायला मिळाले व आनंद मिळू लागला.

या कामामुळे माझा आत्मविश्वास खूप वाढला की मी पण चूल व मूल याच्याशिवाय काहीतरी करू शकते. हे काम करताना नवीन-नवीन प्रशिक्षणांमध्ये आम्ही सहभागी झालो.

त्यामध्ये एका ट्रेनिंगला धर्माविषयी-जातीबद्दल विषय होता. ते ऐकून माझ्या मनातील जाती-धर्माविषयी सुरुवातीला जे गैरसमज होते ते दूर झाले; म्हणजेच मतपरिवर्तन झाले.

एकदा काय झाले माझ्या मैत्रिणीच्या घरातील मुलीने दुसऱ्या जातीच्या मुलाशी लग्न केले. त्यांच्या घरातील वातावरण खूप बिघडले. म्हणजे ते खूप टेन्शन घेऊ लागले. 'समाज काय म्हणेल?', ' आता आपण लोकांना कसं तोंड दाखवायचं?' याबद्दल त्यांना चिंता वाटू लागली. मी माझ्या मैत्रिणीला विचारले, 'बरेच दिवस झाले. तू खूप काळजीत दिसतेस. ती म्हणाली, ''माझ्या पुतणीने दुसऱ्या जातीच्या मुलाशी लग्न केलं. त्यामुळे आम्हाला खूप टेन्शन येतं. आमच्याही तीन मुली आहेत. त्यांचं कसं काय होईल याचं.''

यावर मी तिला म्हणाले, ''अगं काही हरकत नाही. जात दुसरी असली म्हणून काय झालं? तोही माणूसच आहे ना. आणि 'मानवता' हाच खरा धर्म आहे. जातपात हे सर्व आपणच तयार केलेलं आहे.'' यावर ती म्हणाली, ''बोलणं सोपं आहे. तुझ्यावर अशी वेळ आली असती तर काय केलं असतंस? म्हणजे तू दुसऱ्या जातीच्या मुलाबरोबर लग्न केलं असतंस का? आणि तुझी मुलगी जर जातीबाह्य मुलाबरोबर लग्न करायचं म्हणाली, तर तू काय करशील?''

मी म्हणाले, ''माझं तर लग्न झालेलं आहे. पण जर माझ्या मुलीबरोबर असं काही घडलं, तिने जर जातीबाह्य मुलाबरोबर लग्न करायचं ठरवलं तर मी तिच्या पाठीशी उभी राहीन. मी तिला साथ देईन, जरी माझ्या घरच्यांचा विरोध असला तरीही.'' हे ऐकून ती शांत झाली.

**कल्याणी दोंद**

कोरेगाव, वर्क फॉर इक्वॅलिटी

# सहभावी समाजासाठी 'सलोखा'

**'सलोखा' हा समाजात धार्मिक, सामाजिक सलोखा टिकावा, मजबूत व्हावा म्हणून काम करणारा संपर्क गट आहे. या गटाचा परिचय इथे देत आहोत.**

गेल्या काही वर्षांत अल्पसंख्य समाजातील नागरिकांवर होणाऱ्या हिंसक हल्ल्यांच्या, मॉब लिंचिंगच्या घटना, दलित, वंचित समुहांच्या नागरिकांवरील हल्ल्यांच्या घटना वाढल्या आहेत. इतकेच नाही तर अशा प्रकारे हिंसेचा वापर करण्याला मान्यता मिळत आहे. एखादया माणसाला केवळ तो वेगळ्या धर्माचा, जातीचा आहे म्हणून माणसांचा एक समूह एकत्र येऊन ठेचून मारतो; त्या घटनेची व्हिडिओ क्लिप अगदी थोड्या वेळात समाजमाध्यमावरून सार्वत्रिक होते, बहुसंख्य समाजातील माणसे ही व्हिडिओ क्लिप बघतात, त्यावर विकृत भाष्यही करतात; ही सारी प्रक्रियाच आपल्याला अमानुष बनवणारी आहे. याने अस्वस्थ होऊन हे थांबवायला हवे या विचारातून एकत्र आलेल्या लोकांनी ९ सप्टेंबर २०१८ रोजी 'सलोखा' गटाची स्थापना केली.

**सहिष्णू परंपरेला छेद**

खरे तर भारतात आणि महाराष्ट्रात विविध धर्म, पंथ, भाषा आणि संस्कृती एकजीव पद्धतीने रूजल्या आहेत. एकमेकांच्या परंपराविषयी आदर, त्यांचा स्वीकार, वैविध्यपूर्ण संस्कृतींचे एकमेकांत सहजपणे मिसळून जाणे ही या देशाची

## प्रत्येकाला स्वत:च्या मर्जीनुसार उपासना करण्याचा अधिकार आहे!

तेवीस डिसेंबर २०१८ रोजी कोवाड येथे घडलेली ही घटना आहे. चोवीस-पंचवीस डिसेंबरच्या वर्तमानपत्रातील एका छोट्या बातमीतून ती आमच्यापर्यंत पोहचली. 'कोवाड' हे चंदगड तालुक्यातील महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरचे छोटेसे गाव आहे. 'येशूच्या प्रार्थनेसाठी एका घरात जमलेल्या तीस चाळीस जणांवर अज्ञात इसमांकडून हल्ला. दहा बारा लोक गंभीर जखमी. जखमींवर बेळगाव येथील रुग्णालयात उपचार सुरू. कोल्हापूर पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख यांच्या देखरेखीखाली तपास जारी'. अशा स्वरूपाची ती बातमी होती.

या धक्कादायक घटनेचा तपशील समजून घेण्यासाठी सलोखा गटातील आम्ही काही प्रतिनिधींनी कोवाडला भेट दिली. कोवाड गावात आणि आसपासच्या परिसरात हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, लिंगायत अशा वेगवेगळ्या धार्मिक श्रद्धा बाळगणारे समाज वर्षानुवर्षे अतिशय सलोख्याने रहात आहेत. अशा भागातील या छोट्याशा गावात येशूच्या प्रार्थनेसाठी जमलेल्या तीस चाळीस माणसांच्या समुहावर हिंसक हल्ला होणे धक्कादायक होते.

आमच्या भेटीदरम्यान हल्ल्याच्या वेळी हजर असणारे लोक जमले होते. ही सर्व मंडळी समाजातील गरीब आणि मागास समाजातील दिसत होती. स्वाती चव्हाण या सर्वांच्या मुख्य सूत्रधार म्हणून बोलत होत्या. २००४ पासून चव्हाण कुटुंब या ठिकाणी रहाते. तेव्हापासून या घरात दर रविवारी येशूच्या प्रार्थनेसाठी लोक जमतात. २३ तारखेलाही सुमारे चाळीस लोक प्रार्थनेला जमले होते. प्रार्थना सुरू असताना अचानक तोंडावर काळी फडकी, मास्क लावलेले आठ दहा लोक आत घुसले. खोलीत घुसण्यापूर्वी त्यांनी बाहेर ठेवलेल्या खुर्च्या तोडल्या. आणलेल्या बियरच्या बाटल्या फोडून काचा पसरल्या. जमलेल्या लोकांवर मागून हल्ला केला. काहींवर तलवारीचे घाव घातले. काहींना सळईनी, बांबूनी फटके मारले. मागे असलेल्या लोकांना मारहाण करत हल्लेखोर आत आले. पुढे येत त्यांनी बायकांना, लहान मुलांनाही मारहाण केली. त्यावेळेस स्वाती चव्हाण यांच्या सासूबाईंनी स्वयंपाकघरातून मिरचीची पूड आणली आणि हल्लेखोरांवर टाकली. तेव्हा हल्लेखोर पळून गेले. हल्ला सुरू

मूलभूत ओळख राहिली आहे. गेल्या काही वर्षांत मात्र ही ओळख पुसून टाकणारे, धार्मिक, सामाजिक सलोखा नष्ट करणारे विद्वेषाचे, संशयाचे वातावरण वाढत चाललेले आहे. या घटनांची पुरेशी दखलही घेतली जात नाही.

**प्रसारमाध्यमे आणि पोलीस यांची भूमिका**

प्रसारमाध्यमातून मोठ्या प्रमाणात गैरसमज पसरवले जात आहेत. वॉट्सॲप, फेसबुक, ट्विटरद्वारे खोट्या बातम्या, खोटी माहिती पसरवली जाते. अशा प्रचारामुळे समाजात फूट पडते आहे. या अत्याचारांना आळा घालण्यात पोलीस यंत्रणा अपयशी ठरताना दिसते. बरेचदा सत्ताधाऱ्यांचा त्यांच्यावर दबाव असतो. काहीवेळा त्यांचीच मानसिकता धर्मांध आणि जातीयवादी बनलेली असते. त्यामुळे ते अत्याचार करणाऱ्यांनाच पाठीशी घालताना दिसतात. न्याय्य, निष्पक्ष भूमिका घेणाऱ्या काही पोलीस कर्मचारी आणि अधिकारी यांना धर्मांध शक्तींच्या हल्ल्यांना बळी पडावे लागल्याच्याही घटना घडल्या आहेत. (उत्तर प्रदेशातील बुलंदशहर येथील हिंसाचाराच्या घटनेत इन्सपेक्टर सुबोध कुमार सिंह यांना धर्मांध दंगलखोरांनी ठार मारले.) एकूणच पोलीस यंत्रणेचेही अमानुषीकरण होताना दिसते आहे. बेभान धर्मांध समुहाने कायदा हातात घेऊन स्वतःच न्याय करणे आता समाजमान्य होत आहे. याचा अर्थ आपला समाज एका अराजक, अमानुष व्यवस्थेकडे वाटचाल करत आहे. हे अत्यंत भयावह आहे.

आज धार्मिकदृष्ट्या अल्पसंख्य समाज, दलित, वंचित समाज भयग्रस्त अवस्थेत जगत आहे. शिक्षण, आरोग्य, अन्य नागरी सुविधा, आर्थिक विकास अशा क्षेत्रातून त्यांना वगळले जात आहे. त्यांच्यावर दुय्यम नागरिकत्व लादले जात आहे. अशा तणावाच्या परिस्थितीचा सर्वात वाईट आणि नकारात्मक परिणाम होतो तो या समुहातील स्त्रियांवर! स्त्रियांवरील बंधने आणखी तीव्र होतात.

अशा परिस्थितीत या हिंसेला नकार देऊन, धार्मिक-

असताना गावातील लोक रस्त्यावर येण्याचा प्रयत्न करत होते. पण हल्लेखोरांनी रस्त्यावर बांबू टाकून रस्ता अडवला होता. त्याचवेळी तिथून दै. सकाळचे प्रतिनिधी जात होते. त्यांच्या लक्षात आले की हा हल्ला आहे. त्यांनी जखमींना बेळगावला उपचारांसाठी नेण्यासाठी मदत केली. कोल्हापूर पोलीस मुख्यालयाशी संपर्क साधून घटनेच्या गांभीर्याची कल्पना दिली. त्यामुळे अर्ध्या तासात पोलीस अधिकारी येऊन पोहचले. तपास वेगाने करण्यात आला.

गेल्या १२-१४ वर्षात याठिकाणी हजार ते दोन हजार माणसे प्रार्थनेला येऊन गेली आहेत. त्यात सर्व जातीधर्माची माणसे होती. आजवर कोणी कसलाही विरोध केलेला नव्हता. प्रत्येकाला स्वत:च्या मर्जीनुसार उपासना करण्याचा अधिकार संविधान देते. सलोखा गटातर्फे कोल्हापूर पोलीस अधीक्षक आणि तपास अधिकाऱ्यांशी संपर्क साधून माहिती घेण्यात आली. त्यांनी अतिशय वेगाने तपास करून हल्लेखोरांना पकडले. त्यांच्यावर गुन्हे दाखल केले. त्यामुळेच या परिसरातील सामाजिक सलोखा टिकून राहिला.

या घटनेमुळे कोवाड, आजरा, गडहिंग्लज परिसरातील विविध धर्मियांत अस्वस्थता होती. स्थानिक धार्मिक सलोख्याच्या परंपरेला बाधा पोहचविणारी ही घटना होती. म्हणूनच समाजातील सामंजस्य कायम राहावे यासाठी गडहिंग्लज येथे २४ मार्च, २०१९ रोजी सलोखा परिषद घेण्यात आली. अनेक स्थानिक पक्ष, संघटना आणि संस्था यांनी या परिषदेत सक्रिय सहभाग घेतला. ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज बंडगर, फादर ज्यो मांतेरो आणि बसवलिंगजी स्वामी यांनी धार्मिक सलोखा आणि परस्पर धर्मपरंपरांचा आदर या विषयी लोकांशी संवाद साधला. विविध धर्मांचे लोक मोठ्या उत्साहाने परिषदेत सहभागी झाले होते. धार्मिक आणि जातीय हिंसाचार रोखण्यासाठी ठामपणे उभे रहाण्याचा निर्धार करण्यात आला. गडहिंग्लज येथे सलोखा गटाचे काम सुरू करण्यात आले.

या वर्षीचा कोवाडचा ख्रिसमस नक्कीच शांततामय आणि आनंदाचा असेल याची आम्हाला खात्री आहे.

सावंतवाडी, कुडाळ, वेंगुर्ला इत्यादी परिसरातही सलोखा गट विस्तारित झाला आहे. आपणही सलोखाच्या कामात सहभागी होऊ शकता.

**प्रमोद मुजुमदार**, पुणे

सामाजिक सलोखा जपणे ही प्रत्येक संवेदनशील, लोकशाहीवादी नागरिकाची जबाबदारी आहे. **विशेषतः अल्पसंख्य समाजातील नागरिकांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचारांविरुद्ध बहुसंख्य समाजातील नागरिकांनी ठामपणे उभे राहणे आवश्यक आहे;** या भूमिकेतूनच सलोखा गटाची स्थापना करण्यात आलेली आहे.

**सलोखा गटाची उद्दिष्टे**

१. समाजातील सामाजिक, धार्मिक आणि जातीय सलोखा टिकावा आणि बळकट व्हावा यासाठी पूरक आणि आवश्यक कार्यक्रम हाती घेणे.

२. धार्मिक विद्वेष, वैरभाव वाढवणाऱ्या घटनांना शांततापूर्ण मार्गाने घटनेच्या चौकटीत राहून विरोध करणे.


३. धार्मिक, जातीय हिंसाचाराच्या घटनांच्या प्रसंगी हिंसाग्रस्त नागरिकांच्या बाजूने ठामपणे उभे राहणे. त्यांना प्रत्यक्ष साहाय्य करणे, कायदेशीर मदत करणे, संरक्षण देण्याचा प्रयत्न करणे, सत्यशोधन समितीच्या माध्यमातून अशा घटनांचा शोध घेणे आणि वास्तव समाजापुढे आणणे.

४. सामाजिक, धार्मिक आणि जातीय सलोख्यास बाधा आणणाऱ्या घटकांबाबत सतत जागृत रहाणे.

५. महाराष्ट्रातील सहिष्णू, समतावादी धार्मिक-सांस्कृतिक परंपरांना उजाळा देणे, त्या बळकट करणे आवश्यक आहे. यासाठी स्थानिक नागरिकांच्या सहभागाने विविध ठिकाणच्या अशा परंपराचा शोध घेण्याचा व त्या समाजापुढे आणण्याचा प्रयत्न सलोखातर्फे केला जाईल.

सलोखा गटाने दोन ऑक्टोबर, २०१८ रोजी पुण्यातील एका शाळेतील माध्यमिक विद्यार्थ्यांची सर्व धर्माच्या प्रार्थनास्थळांची ओळख करून देण्यासाठी एक दिवसाची सहल आयोजित केली होती. या उपक्रमाला विद्यार्थ्यांनी अतिशय चांगला प्रतिसाद दिला.

तसेच 'ॲक्टिव्ह टीचर्स फोरम' या सजग शिक्षकांच्या वार्षिक संमेलनात शालेय शिक्षणात सलोखापूरक कार्यक्रम कसे



चित्र - समीधा म्हात्रे, के. पी. सशी

घेता येतील, याबाबत संवाद साधण्यात आला.

**प्रेमाची वारी**

सलोखातर्फे 'कारवाँ-ए-मुहब्बत' अर्थात 'प्रेमाची वारी'च्या अभिवाचनाचा कार्यक्रम केला जातो. गेल्या काही वर्षांत मॉब लिंचींगच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्या ठिकाणी जाऊन, बळींच्या कुटुंबियांना भेटून त्यांना धीर देण्यासाठी, त्यांना त्यांच्या सोबत असल्याची ग्वाही देण्यासाठी 'कारवाँ-ए-मुहब्बत' निघाला होता. मानव अधिकार कार्यकर्ते हर्ष मंडर यांची ही संकल्पना होती. या गटाने आठ राज्यांमध्ये फिरून अशा कुटुंबांची भेट घेतली. 'हिंसेला हिंसा हे उत्तर कधीच असता कामा नये. डोळ्याच्या बदल्यात डोळा मागितला तर सगळं जगच आंधळं होऊन जाईल. म्हणून प्रेमाची फुंकर आणि प्रेमाची भाषा बोलायला हवी.' या गांधीजींच्या विचारांशी आणि डॉ. आंबेडकरांनी घटनेत सांगितलेल्या बंधुतेच्या तत्त्वाशी बांधिलकी मानणारा हा कारवाँ होता. त्या अनुभवांवर आधारित 'कारवाँ-ए-मुहब्बत' हे पुस्तक. त्याचा मराठी अनुवाद म्हणजेच प्रेमाची वारी. विविध ठिकाणी या अभिवाचनाचे कार्यक्रम व्हायला हवेत.

**संपर्क : सलोखा**, द्वारा प्रयास, अमृता क्लिनिक, दुसरा मजला, संभाजी पूल कोपरा, पांचाळेश्वर मंदिराजवळ, कर्वे रस्ता, पुणे ४११००४

प्रमोद मुजुमदार (मो.) ९३२६५१६२५१

इमेल आयडी : salokhasalokhaa@gmail.com

# पुरुषसत्ताक व्यवस्था संपवूया

हैद्राबादमध्ये एका डॉक्टर युवतीवर सामूहिक बलात्कार करून तिला जाळून टाकण्याची निर्घृण घटना घडली. त्याबद्दल संतापाची लाट उसळणे साहजिकच होते. त्यानंतर पोलिसांनी आरोपींना चकमकीत ठार केल्याची बातमी आली. 'पोलिसांनी बलात्कारितेला न्याय मिळवून दिला' म्हणून त्या पोलिसांवर फुले उधळली गेली, त्यांचे कौतुक केले गेले. मोठ्या प्रमाणावर समाजातून विविध प्रकारच्या प्रतिक्रिया उमटल्या. या पार्श्वभूमीवर लोकांशी संवाद साधणारा एक अनोखा कार्यक्रम 'वर्क फॉर इक्वॅलिटी'ने घेतला. त्यासाठी स्थळ निवडले तळेगावजवळचा घोरावडेश्वर डोंगर. रविवारी सकाळी तिथे खूप लोक फिरायला येतात. त्यांच्याशी संवाद साधून त्यांनी सहयांची मोहीम राबवली.



'इनकाउंटर माणसांचे नको – पुरुषसत्ताक पद्धतीचे झाले पाहिजे.' असे परखड मत या वेळी मांडण्यात आले. 'न्याययंत्रणेला बगल देऊन कायदा हातात घेणे हे कोणत्याही प्रश्नावरचे कायम स्वरूपाचे उत्तर असू शकत नाही, तर स्त्रियांना दुय्यम समजणाऱ्या, वस्तू समजणाऱ्या पुरुषसत्ताक व्यवस्थेचे समूळ उच्चाटन करणे गरजेचे आहे'. असे मत या अभियानाला पाठिंबा देणाऱ्या युवकांनी, पुरुषांनी दिले. 'स्त्रियांवरील अन्याय पूर्णपणे थांबवायचे असतील तर 'कायदयाच्या कडक अंमलबजावणीची गरज आहे'. 'स्त्रियांवर होणाऱ्या कोणत्याही स्वरूपाचा अन्याय मग तो बलात्कार असो किंवा मुलींना गर्भातच मारून टाकणे असो किंवा हुंडाबळी, ॲसिड फेकणे, बाल लैंगिक शोषण असो, अशा सर्व प्रकारच्या घटनांसाठी तालुक्याच्या ठिकाणी 'फास्टट्रॅक कोर्ट' म्हणजे जलदगती न्यायालये असावीत', 'न्याय यंत्रणेने २४ तास सेवा दिल्यास अनेक खटले लवकर निकाली लागू शकतात'. असे विचार नागरिकांनी व्यक्त केले.

एनकाऊंटर करून कायदा हातात घेणे म्हणजे जंगल राज आल्यासारखेच आहे. अशा प्रकारे एनकाऊंटरमध्ये गरिबांचा, दलितांचा, आदिवासींचा, ज्यांच्या हातात सत्ता नाही अशांचा बळी घेतला जाण्याची शक्यता जास्त आहे. त्याउलट अनेक पांढरपेशे पुरुष ज्यांच्यावर स्त्रियांच्या लैंगिक शोषणाचे आरोप आहेत व ते सर्वांना माहीत आहे तरी देखील त्यांच्यावर मात्र कारवाई का होत नाही, असे प्रश्नही उपस्थित केले गेले. न्याय लवकर मिळतो हा विश्वास लोकांच्या मनात निर्माण होणे गरजेचे आहे. बलात्कारी हा एका रात्रीत तयार होत नाही तर बलात्कार करणे ही एक प्रवृत्ती असून ही प्रवृत्ती कुटुंबात व समाजात स्त्रियांना जी असमानतेची वागणूक दिली जाते ती पाहून तयार होते. जर घराघरातून मुलग्यांना मुलींचा व स्त्रियांचा सन्मान होतो हे बघायला व अनुभवायला मिळाले तर ते बलात्कारासारखे अमानवीय कृत्य करणार नाहीत. आणि म्हणून 'पुरुषसत्ताक व्यवस्थेवर' आपण सर्वांनी मिळून घाव घातले पाहिजेत, ती समूळ नष्ट केली पाहिजे.

**प्रभा जाधव**

वर्क फॉर इक्वॅलिटी, तळेगाव दाभाडे

# आम्ही ‘बि’घडलो

**वाय.व्ही.व्ही.पी. अंतर्गत पुण्यातल्या अनेक वस्त्यांमध्ये युवा गटाबरोबर जीवनकौशल्याचे वर्ग घेतले जातात. यापैकी काही ठिकाणी आपली पुस्तकपेटी दिलेली आहे. या वर्गामुळे, तिथल्या चर्चांमुळे या मुलांच्या विचारांमध्ये, व्यक्तिमत्त्वामध्ये अनेक सकारात्मक बदल होत आहेत. या बदलांची झलक आपल्याला या लेखांमधून मिळते. त्यांचे अस्सल अनुभव आणि विचार त्यांच्याच शब्दात इथे देत आहेत.**

## बदलाचा सुंदर प्रवास

मागील दोन वर्षे ही माझ्या जीवनातील खूप महत्त्वाचा भाग आहेत. यार्दी संस्था वेगवेगळ्या वस्त्यांमध्ये जाऊन ‘लाईफ स्कील-जीवनकौशल्या’चे वर्ग घेते. यामध्ये ‘मी, माझे शरीर, स्त्री-पुरुष समानता, मैत्री, प्रेम, आकर्षण, धोकादायक वर्तन’ इत्यादी विषय मुलां-मुलींपर्यंत पोहचवले जातात. यामध्ये मी सहभागी झालो आणि माझा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोनच बदलून गेला. दोन वर्षांपूर्वीचा मी आणि दोन वर्षांनंतरचा आत्ताचा मी यामध्ये खूप फरक पडला आहे. माझ्या विचारांमध्ये जे काही बदल झालेत त्याबाबत मला थोडक्यात सांगायचे आहे.

माझ्या वस्तीतील संत नामदेव विद्यालयात गट सुरू झाला. गट आठवड्यातून एकदा व्हायचा. माझे बरेच मित्र त्या गटामध्ये होते. माझे मित्र मलापण चल बोलायचे. ‘तू पण या वर्गाला ये, गटातील विषय खूप सुंदर आहेत’ असे सतत सांगायचे. पण ‘अशा बोअर लेक्चरला मी बसणार नाही’ असे मी मित्रांना सांगायचो. तीन ते चार महिन्यांनंतर मात्र मला माझ्या मित्रांमध्ये फरक दिसू लागला. त्यांच्या बोलण्यात, वागण्यात खूप बदल जाणवू लागले. चांगलीच सुधारणा दिसून आली. मित्रांकडून माहिती ऐकून माझीही उत्सुकता वाढू लागली.

मी दर शुक्रवारी संध्याकाळी साडेसहा वाजता कामावरून येऊन गटात बसायचो. दोन वर्षांपूर्वी माझे विचार अतिशय घाण व वाईट होते. कोणासोबत जास्त न बोलणारा, स्टेज डेअरिंग नसणारा व सतत व्यसन करणाऱ्या मित्रांबरोबर असणारा मी हळूहळू बदलत होतो.

महिन्यातील चार दिवस माझी आई व बहिण घरातच राहून वेगळ्या का बसायच्या? त्यांना वेगळे पाणी, वेगळे कपडे का दिले जायचे याचे कोडे मला गटात आल्यावर उलगडले. मासिक पाळी म्हणजे काय? याबाबत कधीही ना शाळेत सांगितले गेले ना घरात कधी माहिती होऊ दिले. मासिक पाळी घाण व अपवित्र नाही. माणसाचा वंश चालवण्यासाठी निसर्गाने केलेली ही योजना आहे. प्रत्येक स्त्रीच्या जीवनातील ती एक महत्त्वाची घटना आहे. समाज त्याला घाण का म्हणतो? जी गोष्ट इतकी नैसर्गिक आहे त्याविषयी मुलांशी बोलायला आपण का लाजतो हे मला कळत नव्हते. अशा अनेक गोष्टी मला शिकायला मिळाल्या.

बघता बघता माझा हा वर्ग पूर्ण झाला. मलाही माझ्यामध्ये झालेल्या बदलाची जाणीव व्हायला लागली. मी थोड्या वेगळ्या पद्धतीने विचार करायला लागलो होतो. हे पाहून पिअर एज्युकेटर म्हणून दर महिन्याला होणाऱ्या ट्रेनिंगसाठी मला निवडण्यात आले. या ट्रेनिंगमध्ये अनेक विषयांची सखोल चर्चा केली जायची. माहिती देण्यासाठी बाहेरच्या काही तज्ज्ञ व्यक्तींना बोलावले जायचे. ही सर्व सत्रे खूप अभ्यासपूर्ण व खूप भारी असत.

हळूहळू माझे स्टेज डेअरिंग वाढू लागले. याआधी मी कधीच मोठ्या गटासमोर बोललो नव्हतो, पण दादाने मला महिला दिनानिमित्तच्या कार्यक्रमात सूत्रसंचालन करण्याची संधी दिली.

हा असा प्रोग्रॅम आधीपासून मिळाला असता तर अजून खूप काही करता आले असते. एक छोटासा अनुभव सांगतो.

ताई व दादाने एक उपक्रम सुरू केला. वस्तीतील शाळा सोडलेल्या मुलांचा सर्वे करून त्यांच्या पालकांशी भेट घ्यायची, त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून द्यायचे, जेणेकरून ते त्यांच्या मुलांना पुन्हा शाळेत पाठवतील असा तो उपक्रम होता. आम्ही त्या मुलांची यादी घेतली व घराघरात जाऊन पालकांशी संवाद सुरू केला. या अगोदर मी कधीच पालकांशी असा वन-टू-वन संवाद केला नव्हता. समोरच्याशी आदर देऊन कसे बोलावे, समोरच्याचे बोलणे पूर्ण ऐकून घेऊन त्यानंतर आपले मत कसे मांडावे हे यातून शिकायला मिळाले. हा अनुभव खूप महत्त्वाचा व सुंदर होता. आम्ही वस्तीतील २५ ते ३० मुलांना पुन्हा शाळेत जाण्याची संधी उपलब्ध करून दिली.

या सर्व गोष्टींचा मला माझ्या आत्ताच्या व पुढच्या आयुष्यात खूप उपयोग होणार आहे. सध्या मी शिकलेल्या चांगल्या गोष्टी वस्तीमध्ये, अभ्यासिकेत व मी करत असलेल्या कामाच्या ठिकाणी करत आहे व सतत करत राहिन. तसेच माझ्यासारख्या मुलांना या प्रोग्रॅमचा नक्की फायदा करून देईन.

**संदीप चव्हाण**

गुलटेकडी औद्योगिक वसाहत, पुणे

---

## संवाद महत्त्वाचा

माझी जीवनकौशल्याची सर्व सत्रे पूर्ण झाली. त्यानंतर मी एके दिवशी घरच्यांना प्रश्न विचारला, ''तुम्हाला माझ्यात काही फरक पडला आहे असं वाटतं का? तेव्हा मला सर्वांनीच काही वेगळं उत्तर दिलं नाही.'' पण माझ्या वहिनीने त्याचं उत्तर खूप छान दिलं. त्या म्हणाल्या, ''मी खूप दिवस बघते, की तुम्ही मला व आपल्या घरातल्यांना खूप गोष्टीत समजून घेत आहात. योग्य पद्धतीने उत्तर देता.'' हे उत्तर ऐकून मला खूप भारी वाटलं. मग मी वहिनींशी, घरच्यांसोबत स्त्रियांचं स्थान, समानता या गोष्टींवर संवाद साधू लागले. यातूनच माझी वहिनी माझी खूप चांगली मैत्रीण झाली.

आमच्या घरात सध्या माझ्या लग्नाचा विषय खूप चालतोय. पण मला हवा तसा मुलगा मिळत नाहीये. म्हणून घरच्यांनी व नातेवाईकांनी माझी कुंडली बघून शांती करण्याचं ठरवलं. तेव्हा मी त्यांच्याशी संवाद साधायला सुरवात केली. मी त्यांना विचारू लागले की, 'शांती करून देखील फरक नाही पडला तर शांती करणारा व्यक्ती आपला झालेला खर्च परत देईल का?' या व अशा संवादातूनच हा विषय आमच्या घरातून हद्दपार झालेला आहे.

**मीनाक्षी**

प्रेमनगर, पुणे

## एक जखम खोल खोल

मी माझा धार्मिक असमानतेचा अनुभव इथे मांडू इच्छितो. लहानपणापासूनच मी मांसाहार करत आहे. एका फोटोग्राफरसोबत प्रोजेक्ट करत असताना आलेला हा कटू अनुभव आहे. हिंजवडी येथील एका रेस्टॉरंटमध्ये व्हिडीओ शुटींग करायला आम्ही गेलो होतो. मला तिथे किचन डिपार्टमेंटचे शुटींग करण्याची जबाबदारी सोपविली होती. तेथे मासे, तंदूर इ. पदार्थ होते. शुटींग करत असताना त्यातील एका तंदूरला माझा स्पर्श झाला. ते सरांनी पाहिलं. त्यांनी मला किचनच्या बाहेर बोलावले आणि सांगितले, ''तुझ्या हातातील सर्व इक्विपमेंटस कारमध्ये ठेव. कॅमेरा व हे इक्विपमेंट माझं धनलक्ष्मी आहे. आणि नॉनव्हेज खाऊन यांचा हात लावलेला मला चालणार नाही.''

यांच्याशी संबंधित आणखीन एक अनुभव तोही मांडतो. जेवणाच्या सुट्टीमध्ये सर नेहमी इतरांबरोबर जेवायला बसत. एकमेकांच्या डब्यातील वाटून खात. परंतु माझा किंवा त्यांचा डब्बा कधीही शेअर करत नसत.

धर्म एखाद्या व्यक्तीच्या कलेला, मतांना, प्रश्नांना, उत्तरांना दाबू शकतो, हा अनुभव या गोष्टीमुळे मी घेतला. आणि मी हा जॉब सोडायचा निर्णय घेतला.

**तौसिफ**

आनंदनगर, पुणे

# वाचक लिहितात...

मागील (जून) चुलीपल्याडच्या अंकात परचम संस्थेच्या कामाची ओळख करून देणारा ‘तू इस आँचल का एक परचम बना लेती तो अच्छा था’ हा लेख प्रसिध्द केलेला होता. त्या लेखावरच्या काही प्रतिक्रिया इथे देत आहोत.

‘परचम’ संस्थेने खूप चांगल्या प्रकारे काम केले आहे. फुटबॉल खेळाच्या माध्यमातून दोन धर्मांमधील मुलींना एकत्र आणून, त्यांना खेळाची आवड निर्माण व्हावी, त्यांनी घरातून बाहेर पडावे, स्वातंत्र्याचा अनुभव घ्यावा यासाठी प्रयत्न केला. त्यांच्यामधील संवाद आणि मैत्रीची भावना वाढावी यासाठी या खेळाद्वारे प्रयत्न केले.

हा बदल घडवण्यासाठी त्यांना खूप अडचणी आल्या. परंतु इतर व्यक्ती, संस्था, अधिकारी यांची मदत घेऊन त्यांनी त्या सोडवल्या. त्यांनी ज्या प्रकारे मुलींमध्ये बदल घडवून आणला त्याला सलाम.

खरे तर मुली लग्नाच्या वयात आल्या की खेळणेच विसरून जातात. मग त्या हिंदू असू द्या किंवा मुस्लिम किंवा इतर जातीतील. का तर लोक काय म्हणतील. ‘तेरी बहेन सबके सामने खेल रहीं थी’ या एवढयाशा गोष्टीसाठी मुलींना घरच्यांकडून मार खायला लागणे म्हणजे खूप बंधनात अडकून जगण्यासारखेच नाही का झाले? अजूनही खूप ठिकाणी ही परिस्थिती पहायला मिळते, खेळायला आवडत असूनसुद्धा मुली खेळत नाहीत. का तर, लोक काय म्हणतील?

पार मैदानापासून ते स्वतःचे मत आणि इच्छा मांडण्यापर्यंत असला कोणताच हक्क मुलींना नाही. मी म्हणेल प्रत्येक गावात मुलींसाठी खेळण्याचे मैदान आणि मनमोकळेपणाने बोलण्यासाठी व्यासपीठ हे असलेच पाहिजे. पण त्यासाठी कुटुंबातील वातावरण तसे निर्माण होणे खूप गरजेचे आहे. मग ‘तेरी बहेन सबके सामने खेल रही थी’ हा प्रश्नच निर्माण नाही होणार !

**स्नेहल थोरवे**
वाडीवळे, दिशा

कोणताही खेळ खेळण्याचा संबंध धर्माशी नको. कारण खेळण्याचे स्वातंत्र्य प्रत्येकाला आहे. प्रत्येकाला स्वप्न, इच्छा आहेत, मन आहे. त्याचा धर्माशी काय संबंध? प्रत्येकाने मनाचा व स्वप्नांचा विचार करायला हवा. समाजाचा व धर्माचा पाहण्याचा दृष्टिकोन हा फार वेगळा आहे. मी सर्व धर्म समभाव मानते. धर्म म्हणा किंवा जात, कोणत्याही जातीच्या वा धर्माच्या माणसाच्या बोटाला कापले तर रक्त हे लालच येते. बघा बरे हा त्या धर्माचा म्हणून यांचे रक्त निळे, दुसरा त्या धर्माचा म्हणून त्यांचे रक्त पिवळे असे काही होत नाही. कोणत्याही धर्माच्या माणसाचे बोट कापले तरी रक्त लालच येते. म्हणून माणसाने धर्माधर्मामध्ये व जातीजातीमध्ये भेदभाव करायला नाही पाहिजे.

**वर्षा बांगर**
वळक, दिशा

या लेखातून मला खूप शिकायला आणि अनुभवायला मिळाले.

‘परचम’ या संस्थेने मुलींना खेळ खेळायला लावले. त्यांना फुटबॉल खेळण्यासाठी तयार केले. आणि हिंदू-मुस्लिम मुली एकत्र येऊन खेळल्या ही खूप कौतुकास्पद गोष्ट आहे.

मुंब्रा या ठिकाणच्या ह्या सर्व मुली. तिथे ८०% मुस्लिम लोक राहतात. आणि काही हिंदू आहेत. पण त्यांचा एकमेकांशी संबंध नाही. एकमेकात मिसळणे नाही. मुलींना खेळासाठी मैदान नव्हते. ते मिळावे यासाठीही त्यांना खूप प्रयत्न करावे लागले.

जर त्यांनी असा विचार केला असता की कोणी आपल्याला मदतच करणार नाही आणि इतक्या आव्हांनाना तोंड द्यायचे आहे. तर त्या हे यश कधीच मिळवू शकल्या नसत्या. कदाचित त्यांचे फुटबॉलचे स्वप्न हे फक्त स्वप्नच राहिले असते.

**सुजाता टाकळकर**
बुधवडी, दिशा

# पुस्तकाच्या खजिन्याने काय काय दिले

'पुस्तक पेटी' हा शब्द मी पहिल्यांदा ऐकला तेव्हा हे काय नवीन असा प्रश्न मला पडला होता. पण या उपक्रमाविषयी ऐकल्यावर समजले की ही तर खरोखर तिजोरी आहे ज्ञानाची! फक्त ती उघडण्यासाठी वाचनाची किल्ली लागते.

पुस्तक पेटी ही पंधरा दिवसातून एकदा वस्ती पातळीवर घेतली जाते. वस्तीमधील समूह संघटिकांकडे पुस्तके दिली जातात, समूह संघटिका महिन्यातून दोन दिवस मुलांसाठी हा उपक्रम घेतात. मुलांना पुस्तके वाचायला दिली जातात; ज्यांना वाचता येत नाही त्यांच्यासाठी वाचून दाखवले जाते. वाचन झाल्यावर पुस्तकावर चर्चा केली जाते. त्यातून मुलांच्या मनात असणारे विचार पुढे येतात, त्यांना प्रश्न पडू लागतात, विचार करण्याची सवय लागते. मुलांबरोबर खेळ, गाणी घेतली जातात, शब्दकोडे सोडवणे, शब्द तयार करणे, पुन्हा त्याचा अर्थ शोधून काढणे अशा कितीतरी गोष्टी पुस्तकांच्या जोडीने केल्या जातात.




आजकाल आपण पाहतच आहोत की मुले टीव्ही आणि मोबाइलमध्ये इतकी गुंग झाली आहेत की ती मैदानी खेळ खेळणे तसेच गोष्टी वाचणे विसरत चालली आहेत. अगदी लहान मूल रडायला लागले तरीही पालक फोन हातात देतात आणि विशेष म्हणजे फोन दिल्यावर मूल शांत होते. पालकसुद्धा तासनतास फोन पाहत बसतात मग मुलांकडून अजून काय अपेक्षा ठेवावी? या सगळ्याचे दुष्परिणाम मुलांच्या आरोग्यावर, विकासावर होतात. त्यापेक्षा पालक जर मुलांसमोर पुस्तक वाचत बसले तर मुलेसुद्धा पुस्तक मागतील. बऱ्याच वेळा मुले मोठ्या माणसांचे अनुकरण करत असतात. मुलांना सतत नवनवीन गोष्टी जाणून घ्यायच्या असतात. म्हणून, याच वेळी मुलांना वाचनाची सवय लावायला हवी. वाचनाची आवड निर्माण करायला हवी. नेहमी पुस्तके वाचणारी मुले नुसते गप्प बसून ऐकत नाहीत तर त्यावर स्वतःचे मत मांडतात, चर्चेत सहभागी होतात कारण त्यांच्याकडे शब्दसाठा असतो आणि विचार असतो. पुस्तक पेटीमुळे असे परिणाम होताना दिसत आहेत. या उपक्रमामुळे संघटिकाताई स्वतः पुस्तके वाचायला लागल्या आहेत.

पुस्तकपेटी उपक्रमाच्या निमित्ताने समूह संघटिकांना आलेले अनुभवही प्रेरणादायी आहेत. प्रियांकाताईंच्या मुलीने 'लेकीला उत्तर हवंय' हे मासिक पाळी संदर्भातील पुस्तक

वाचले. शिवाशीव पाळण्याविषयी तिने प्रश्न विचारायला सुरवात केली. आईलाही हट्टाने हे पुस्तक वाचायला लावले. प्रियांकाताई म्हणतात, ''मला काहीच माहिती नव्हते. मला इतक्या उशिरा ही माहिती मिळाली. मग मी हे पुस्तक माझ्या जावेला, नवऱ्याला वाचायला दिलं.'' कविताताईचा अनुभव तर खूप छान आहे. त्या सांगतात, **''पुस्तकपेटी घेत असताना तेजस्विनीने 'ईदगाह' हे पुस्तक निवडलं. पण वाचताना पुस्तकातले काही शब्द तिला समजत नव्हते. मग तेजस्विनीने ते सानियाला विचारले. सानियाने तिच्या प्रश्नांची उत्तरं दिली. तेजस्विनी आणि सानिया दोघींची घरं अगदी शेजारी शेजारी आहेत पण तोपर्यंत दोघी एकमेकींना ओळखत देखील नव्हत्या. पण ईदगाह या पुस्तकामुळे दोघी जवळ आल्या. आता त्या चांगल्या मैत्रिणी झाल्या आहेत. जाती, धर्म विसरून त्या एकमेकींच्या घरी जातात, एकत्र जेवतात.''**

सुरेखाताईंचा अनुभव असाच वेगळा आहे. त्यांचा मुलगा आजारी होता. हॉस्पिटलमध्ये उपचार घेत होता. तेव्हा त्याने दुसरे तिसरे काही न मागता पुस्तक वाचण्यास मागितले. मनोरंजनासाठी फोन, गेम न मागता पुस्तक मागावे ही नक्कीच खूप मोठी गोष्ट आहे. त्याविषयीचा त्यांचा अनुभव त्यांच्याच शब्दात सोबतच्या चौकटीत दिला आहे.

**कविता आणि रेणुका यांनी स्वत: पुढाकार घेऊन हा उपक्रम सुरू केला. खरेतर हा उपक्रम इतक्या वस्त्यांमध्ये सुरू होण्याचे श्रेय या दोघींच्या पुढाकाराला जाते. रेणुकाताई आलोचनाने घेतलेल्या 'विचारा का?' या निवासी कार्यशाळेत सहभागी झाली होती. या कार्यशाळेमुळे अंधश्रद्धेविषयी बऱ्याच गोष्टी समजल्या, अंधश्रद्धेवरील विश्वास उडाला. तिला मूल नाही, म्हणून घरातले तिला एका मांत्रिक आजीकडे घेऊन गेले. तिथे त्यांनी काही प्रयोग केले. पण कार्यशाळेमुळे तो सगळा प्रकार तिच्या लक्षात आला. 'मी असल्या गोष्टींवर अजिबात विश्वास ठेवणार नाही' असे तिने ठणकावून सांगितले. तिच्या वस्तीतील मुली फटकळ होत्या. त्यांना 'वाढीव' म्हणायचे. पुस्तकपेटीमुळे मुली एकत्र येऊ लागल्या, खेळू लागल्या, पुस्तके वाचू लागल्या, एकमेकींचे विचार कळले. यातूनच मुलींनी शिक्षणविषयक नाटक बसवले आणि वस्तीमध्ये विना माइक सादर केले.**

पुस्तकवाचनासाठी वयाची मर्यादा नसते. एकप्रकारे ते आपले मित्रच आहेत. ते कधीही, कुठेही आपल्याला सोबत करू शकतात.

**रुपाली तोडमल**
वाय.व्ही.व्ही.पी., पुणे

---

मी तुम्हाला पुस्तकपेटीसंदर्भातला एक अनुभव सांगणार आहे. माझ्या मुलाला शिक्षणाची फारच छान गोडी आहे, पण त्याला वाचनाची फारशी आवड नव्हती. जेव्हा आलोचनाने मुलांसाठी पुस्तकपेटी सुरू केली, मुलांना वाचनासाठी काही गोष्टीची पुस्तके दिली तेव्हा पासून मात्र माझ्या मुलाला वाचनाची आवड निर्माण झाली आहे.

माझा मुलगा काही महिन्यांपूर्वी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होता. तेव्हा त्याने दुसरा कोणताही हट्ट न करता मला गोष्टीची पुस्तके आणायला सांगितली. मी त्याच्यासाठी पुस्तके घेऊन गेले. त्यातील एका पुस्तकाचे नाव 'दलितांचे कैवारी : ज्योतिबा फुले' हे होते. ते पुस्तक त्याला खूप आवडले.

त्यातील एक-एक गोष्ट तो वाचत होता व तीच नंतर त्याच्या शाळेत सांगत होता. ती गोष्ट त्याच्या वर्गशिक्षकांनाही आवडत होती. त्यातून त्याला जो काही आनंद मिळत होता तो तो मला सांगत असे.

**सुरेखा सरोदे**
कामगार पुतळा, पुणे

# थोडंसं मनातलं...

आज पुस्तक पेटीच्या कार्यक्रम व आढावा बैठकीमुळे मनात चालणाऱ्या खूप आठवणींना उजळा मिळाला. तो तुम्हाला सांगावासा वाटतोय. लहानपणापासून मला मराठी साहित्य वाचनाची खूप आवड. कविता पाठ करणे, मराठीतील पाठ वाचणे हा तर आवडता छंद! आज अचानक याबद्दल बोलणारे व आपलेही ऐकून घेणारे कोणीतरी भेटले. नाहीतर करमणूक म्हणून फक्त यु ट्युबवर वेळ घालवणारी आजची पिढी पहिली तर खूप एकटे एकटे वाटते. ह्या एकटेपणात मनाला विरंगुळा देणारे वाचन हाती आले की एक सकारात्मक ऊर्जा मिळते. शाळेत वाचलेले साहित्य आजही मनाला एक ऊर्जा देते. मला तर असे वाटते की वाचनासारखा जवळचा सखा असूच शकत नाही. मी वाचलेल्या, मला शाळेत असलेल्या काही कविता व धडे मी आजही विसरू शकत नाही. ते आजही जगण्याची नवी उमेद देतात.

केशवसुतांची

*'एक तुतारी द्या मज आणुनी,*
*फुंकीन जी मी स्वप्राणाने,*
*भेदुनी टाकीन सगळी गगने,*
*दीर्घ जिच्या त्या किंकाळीने*
*अशी तुतारी द्या मज आणूनी...*
*जुने जाऊ द्या मरणा लागुनी,*
*जाळुनी किंवा पुरूनी टाका,*
*सडत न एक्या ठाई ठाका,*
*सावध! ऐका पुढल्या हाका*
*खांदयास चला खांदा भिडवूनी ......'*

आजही ही कविता, ह्या ओळी सामाजिक बदल घडवण्याची प्रेरणा देतात.

होनाजी बाळांच्या 'तुझ्या प्रीतीचे दुःख' हयामधून खरे प्रेम कळते, कोलंबसाचे गर्वगीत कठीण परिस्थितीतही यशाचा मार्ग दाखवते. कवी राम जोशींच्या मनात भरलेली सुंदरा खऱ्या मराठमोळ्या सौंदर्यवतीचे दर्शन घडवते. हे साहित्य सारखे वाचावेसे वाटते, त्याबद्दल बोलावेसे वाटते. पण बदलत्या काळात व कामाच्या व्यापात ते शक्य होत नाही. आज पुस्तक पेटीच्या रूपात पुन्हा मनाला समाधान करणारे शब्द ऐकू आले. त्याबदल बोलले गेले व चर्चा करण्यात आली. वंदना बोकील-कुलकर्णी मॅडमनी खूप छान प्रकारे ॲक्टिविटीज घेतल्या. मंद, धुंद, गंध सारखे जास्तीत जास्त शब्द लिहिण्यास सांगितले. सर्वांना छान वाटले. आपण असे खूप शब्द लिहू शकतो असे वाटले. दुसऱ्या ॲक्टिविटीमध्ये त्यांनी एक शब्द सांगून त्यापासून जास्तीत जास्त शब्द तयार करण्यास सांगितले. उदा. आसेतु हिमाचल. त्यानंतर कथाकथन कसे करावे, कविता कशा वाचाव्या त्याबदल चर्चा केली. व त्याचे प्रात्यक्षिक दाखवले. कविता वाचणे ही पण एक कला आहे. कविता नीट वाचली नाही तर तिचा अर्थबोध होत नाही. अर्थपूर्ण वाचन केल्याने कवितेतील भावार्थ कळतो. एका सहभागीने 'एका तळ्यात होती बदके पिले अनेक, होते कुरूप वेडे पिलू त्यात एक' ही कविता सादर केली. या कवितेच्या अर्थाविषयी चर्चा झाली.

खरेतर पुस्तक पेटी हा एक उपक्रम न वाटता जिव्हाळ्याचा विषय आहे असे वाटते. वाचनावर प्रेम करणाऱ्या सर्व वाचकांना खूप साऱ्या शुभेच्छा !

**भावना सूरज**
वाय.व्ही.व्ही.पी., पुणे

# बालपणीची आठवण

माझ्या लहानपणीची ही आठवण आहे. दुसऱ्यांची कामे केल्यावर पैसे भेटतात एवढेच मला माहीत होते.

त्यावेळेस फरशी घासली की पाच रुपये, फरशी पुसली की दोन रुपये असे पैसे भेटायचे. पण तेव्हा ते काम केल्यावर आणि पैसे भेटल्यावर खूप आनंद व्हायचा.

सुमन भडसावळे या आजींच्या घरी मी काम करायचे. त्या मला नेहमी म्हणायच्या, ''माधुरी हे तुझ्या कामाचे पैसे. पण हे पैसे तू खाऊ आणून खर्च करणार. त्यापेक्षा थोडया पैशाचा खाऊ आण आणि एक वही आण.''

मे महिन्याच्या सुट्टीत अशी कामे करून आजींनी सांगितल्याप्रमाणे एक-एक वही आणून माझ्या ४-५ वह्या जमा व्हायच्या. एकदम लोड यायचा नाही आईला.

**माधुरी गायकवाड**
साधना व्हिलेज,
चिखलगाव, मुळशी

# असाही एक अनुभव

**गावातल्या एका ताईंनी त्यांना आलेला अनुभव इथे मांडलेला आहे. हा अनुभव वाचून तुम्हाला काय वाटले? आम्हाला जरूर कळवा.**

मैत्रिणींनो, मला माझ्या बाबतीत आलेला एक अनुभव सांगायचा आहे. मी जेव्हा मुलांना शिकवायला जात होते तेव्हा मुलांना घेण्यासाठी गाडी यायची आणि मी सुद्धा त्याच गाडीतून जायची. जिथे मुलांसाठी गाडी थांबायची तिथे गावमंदिर आहे. काही वयस्कर पुरुषमंडळी मंदिराच्या कट्ट्यावर बसतात. मी नेहमी तिथून जात येत असताना काही दिवसांनी एक गोष्ट माझ्या कानावर आली. ती ऐकून मला जरा विचित्रच वाटलं. त्यांच्यामध्ये अशी चर्चा झाली की 'ही व्यक्ती दररोज देवळासमोरून जाते येते, देवळाच्या कट्ट्यावर बसते. तिला काय पाळी येत नसेल का?' हे मला एका कार्यकर्तीकडून समजलं. मला वाटलं मला येऊन कोणी बोलतं की काय! पण कोणी नाही बोललं.

मला हे म्हणायचं आहे की ह्या विषयावर बाईनं बोललं तर ठीक आहे. पुरुष कसा बोलू शकतो?

तुमची
**अनामिका**

# जग दिसायला लागलं

मी मतीमंद मुलांसोबत काम करते. मी त्यांना आईचे प्रेम देते. अशी म्हणच आहे की रानच्या पाखराला जीव लावला तर तेही जवळ येतं. ही तर मुलं आहेत खूप छान. मला त्यांच्या शिवाय करमत नाही. त्यांच्यासोबत काम करून मी महिलांच्या मिटींगला जाते. मिटींगला गेल्यापासून मला जग दिसलं. नाहीतर चुल-मुल-घर याशिवाय मला काहीच दिसलं नसतं. पण साधना संस्था, मेधाताई यांच्या मुळे मी उंबरा ओलांडला, बाहेर पडले आणि मला जगातलं काही तरी दिसू लागलं. आता मी वाचनालयाचंही काम करते.

**मुक्ता साठे,**
कुळे, साधना व्हिलेज, मुळशी

# नवरात्रीतले नऊ रंग

महिलांनो, नवरात्रीतले नऊ रंग धार्मिक नाहीत, हा तर होता मार्केटिंग करण्याचा फंडा!!

तुम्हाला कधी प्रश्न पडलाय, की कोण ठरवतं हे रंग म्हणून?

किंवा याच दिवशी हाच रंग घालायचा ही परंपरा कितीशे वर्षांपासून चालत आली आहे म्हणून?

हो, आम्हाला पडला हा प्रश्न आणि आम्ही त्याचं उत्तरही शोधून काढलं. उत्तर आणि त्यामागची कथा मोठी रंजक आहे. वाचाच मग आता...

तर, आठवणीप्रमाणे साधारण २००३च्या सुमारास महाराष्ट्र टाईम्सने श्रावणक्वीन आणि नवरात्रीचे नऊ रंग हा प्रकार चालू केला. पहिले दोन-तीन दिवस मटा पुरवणीमध्ये त्या दिवसाच्या रंगाच्या सुंदरशा साडीमधल्या मॉडेलचे फोटो हे आकर्षण होतं. मग आलं 'तुमचेही असे ऑफिसमध्ये सगळ्यांनी एकाच रंगाचे कपडे घातल्याचे फोटो पाठवा' म्हणून आवाहन. मग काय, बँका, शाळा, ऑफिसेस मधल्या ग्रुप फोटोजनी मटा पुरवणीची मधली दोन आणि कधी कधी शेवटचं पानही खाऊन टाकलं.

२००३-०४ साली फक्त जाहिरातींतूनच नाही, तर अशा फोटोजमधूनही बातम्या हुडकून हुडकून वाचाव्या लागत होत्या. बघा, केवढं दिव्य होतं ते!!

तर मटाच्या म्हणण्याप्रमाणं त्यांनी केलं काय? तर प्रत्येक दिवस एका देवीचा असे नऊ देव्यांमध्ये नऊ दिवस वाटून टाकले. आणि मग प्रत्येक देवीला एक रंग दिला. म्हणजे असं पाहा, दुर्गेची दुर्गाष्टमी, म्हणून तिचा एक रंग. असा रंगोत्सवाला मस्त धार्मिकतेचा रंग चढत गेला. खरं असो वा नसो, उत्सवप्रिय भगिनींनी आणि काही बंधुरायांनीही हा सण नवरंगात साजरा करायला सुरूवात केली. हळूहळू दरवर्षी लोक मटाने रंग जाहिर करण्याची वाट पाहू लागले. आता तर काय, रोजचं शेड्यूल व्हॉटसॅप केलं जातं.

पण प्रश्न असा होता, की मटाला असा आचरटपणा का करावासा वाटला? आणि यावर्षी आमच्या हाती आला क्विंटचा लेख.

त्यात त्यांनी २००३ साली मटाचे संपादक असलेल्या भारतकुमार राऊतांनाच या प्रश्नाचं उत्तर द्यायला साद घातली आणि उत्तर जाम खडबडायला लावणारं होतं.

ते म्हणाले, यात धार्मिकता वगैरे काही नाही, तर लोकसत्तेच्या तुलनेनं घसरत चाललेला मटाचा खप वाढवण्यासाठी त्यांनी केलेली ही मार्केटिंग स्ट्रॅटेजी होती. राऊतांनी हेरला रोज ऑफिसला जाणाऱ्या मध्यमवयीन बायकांचा वाचकवर्ग. आणि त्यांना आकर्षित करण्यासाठी मग फोटोज, छान छान साडीतल्या मॉडेल्स हे सगळं रोजच्या मटाच्या पुरवणीत येऊ लागलं.

ही त्यांची ट्रिक मात्र कमालीची यशस्वी ठरली. आजच्या घडीला ऑफिसमध्ये जाणाऱ्या मध्यमवयीन बायकाच काय, घरी येणारी कामवाली आणि कॉलेजला जाणारी मुलं-मुली देखील हे कलर कोड्स पाळतात.

सहज म्हणून सुचलेला हा मार्केटिंगचा उपाय आज १३ वर्षांनंतरही तितक्याच यशस्वीपणे चालू राहिलाय.

आजच्या घडीला गणेशोत्सवात मुंबईचे गणपती नाही पाहिले तरी चालतील, पण नवरात्रात मुंबईच्या लोकल्सचे प्लॅटफॉर्म मात्र नक्कीच पाहाण्यासारखे झालेयत.

हे सगळं लीलया साधून आणणाऱ्या भारतकुमार राऊतांच्या डोकॅलिटीला टीम बोभाटाचा कडक सलाम !!

विशेष नोंद : सध्या अमूक दिवशी अमूक रंग वापरलाच पाहिजे अशी जणू अंधश्रध्दा निर्माण होताना दिसत आहे. तसं होऊ नये म्हणून मुद्दाम हे सांगावसं वाटलं.

(हा लेख आमच्यापर्यंत असाच समाजमाध्यमातून पोचला. तो तुमच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी इथे पुनर्प्रकाशित करत आहोत. पुढच्या नवरात्रात काय करायचं ते आता तुम्हीच ठरवा.)

# जरा शांतपणे विचार करूया?

गेल्या काही वर्षांत स्त्रिया-मुलींवरच्या अत्याचाराचं, हिंसेचं प्रमाण खूप वाढलेलं आहे. रोजच्या रोज अशा कितीतरी घटना आपल्याला वाचा-ऐकायला मिळतात, कितीतरी तर आपल्या पर्यंत येतही नाहीत. एखाद्या घटनेनंतर उद्रेक, निषेध होतो. पण घटना काही थांबत नाहीत. हैद्राबादमध्ये सामूहिक बलात्कार करून युवतीला जाळून टाकण्याची अत्यंत निषेधार्ह घटना घडली आणि चारच दिवसात पोलिसांनी एन्काउन्टर करून आरोपींना ठार मारलं. पोलिसांच्या या कामगिरीबद्दल त्यांच्यावर फुलं उधळण्यात आली. अनेकांना वाटलं पीडितेला न्याय मिळाला. आरोपींना अद्दल घडली बरं झालं. दुसऱ्याच दिवशी अल्पवयीन दलित मुलीवर  सामूहिक बलात्कार करून तिला ठार मारल्याची छोटी बातमी वर्तमानपत्रात आली. स्वत:वरच्या बलात्काराची केस धाडसानं लढणाऱ्या युवतीला भर रस्त्यात जाळण्याचा प्रयत्न झाला. तर न्यायालयात जात असताना उन्नावच्या पीडितेच्या गाडीचा भीषण अपघात घडवण्यात आला. या घटना काय दर्शवतात? या घटना स्वतंत्र-सुट्या सुट्या पाहून चालणार नाहीत. यातून आपल्याला हेच दिसतं की बलात्कारिता आणि आरोपी यांची जात, धर्म, त्यांच्याकडे असणारी राजकीय आणि आर्थिक सत्ता हे घटक न्याय मिळणार का, कसा या गोष्टी ठरवत असतात. त्याला मिळणारी प्रतिक्रियाही ठरवत असतात.

अशा प्रकारे कायदा हातात घेण्याने प्रश्न सुटत तर नाहीतच उलट अधिक बिकट बनतात. न्यायही मिळत नाही. उलट ज्यांच्याकडे सत्ता आहे तेच सत्ता नसणाऱ्याविरुध्द सत्तेचा वापर करतात. त्यामुळे स्त्रिया, दलित वंचित समूह, अल्पसंख्य, वेगळी लैंगिक ओळख असणाऱ्या व्यक्ती अशा 'नाही रे' गटातल्या व्यक्तींना न्याय मिळण्याची आशाच धूसर बनेल. संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिलेला 'कायद्यापुढे सर्वजण समान आहेत' हा अधिकार हिरावून घेतला जाईल. म्हणूनच  अशा घटना घडतात तेव्हा येणारा राग, चीड स्वाभाविक असली तरी त्याच्याशी सामना करायला हवा तो घटनेच्या चौकटीत राहून. कायदा- न्याय व्यवस्था कशी बळकट करता येईल हा विचार करून. अत्याचाराबद्दलचा हा संताप प्रत्येकच अत्याचाराबद्दल तेवढाच आतड्यातून यायला हवा. दलित मुलीवर बलात्कार करून हत्या केली जाते, पेहलू खानला जमाव ठार मारतो, भटक्याविमुक्त समाजाच्या लोकांना ग्राम पंचायतीत नेऊन रायनपाड्याचे गावकरी ठेचून ठार मारतात.... तेव्हाही तो तसाच यायला हवा. आपला राग नि आपली सहानुभूती दोन्हीही, पीडितेची नि आरोपींचा जात, धर्म पाहूनच का व्यक्त होते? या सत्ता समीकरणाच्या पलीकडे जाऊन न्यायाची मागणी आपण कधी करणार?

**वंदना**


**संपादक** : वंदना कुलकर्णी

**कार्यालयीन साहाय्य** : सुवर्णा जाधव, तनजिम खानजादे

**प्रकाशक** : आलोचना, ५, पंचाद्री सोसायटी, दुसरा मजला, अशोक पथ, लॉ कॉलेज रोड, पुणे ४११००४.
फोन : ०२०-२५४४४१२२

**मांडणी** : यदिश ग्राफिक्स, पुणे ३०. **मुद्रक** : मुद्रा, पुणे ३०

**संवादिनी टीम** : वंदना कुलकर्णी, स्नेहल ठक्कर

**संवादिनी प्रकल्पातील सहभागी संस्था** : साधना व्हिलेज, मुळशी; दिशा, तळेगाव दाभाडे; रचना, पानशेत; वर्क फॉर इक्वॅलिटी, तळेगाव दाभाडे; आदिम संस्कृती, फलोदे, आंबेगाव; अनुभूती फाऊंडेशन, पौड; नारी समता मंच, पुणे.

फक्त खासगी वितरणासाठी; या अंकातील विचारांशी आलोचना सहमत असेलच असे नाही.